साप्ताहिक

चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

● वर्ष : १८
● अंक : ४
● पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com

चपराक प्रकाशन
www.chaprak.com

२५ व्या वर्षात पदार्पण
पुढील वर्धापनदिनापर्यंत
(१२ जानेवारी २०२७)
चपराक आणि लाडोबा प्रकाशनाच्या
सर्व पुस्तकांवर
२५ टक्के सवलत

ग्रंथसूची मागविण्यासाठी आमच्या ७०५७२९२०९२ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप करा.

वाचकांचे मन:पूर्वक आभार!

■ सोमवार, दि. ९ ते १५ मार्च २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

# ना विकासकामात राम; ना पात्रात नदी!

## एकेकाळी पुण्याचे वैभव असलेल्या रामनदीची व्यथा

**ज्योती घनश्याम**

**पुणे : कल्पना करा, अवघ्या सत्तर वर्षांपूर्वी एक नदी इतकी शुद्ध होती की तिच्या काठावर राहणारी माणसे तिचे पाणी थेट पिण्यायोग्य मानत असत. पुण्याच्या वायव्येला सह्याद्रीच्या रांगांमध्ये खाटपेवाडी येथे उगम पावून, सुमारे १९.५ किलोमीटरचा नयनरम्य प्रवास करत, बाणेर, बावधन आणि पाषाणसारख्या दाट लोकवस्तीच्या भागातून वाहत औंध येथे मुळा नदीला जाऊन मिळणारी ती नदी आहे (?) होती – रामनदी.**

मुंबई-पुणे महामार्गावरून जाताना आज जर तुम्ही बावधन येथे या नदीच्या पुलावरून खाली डोकावून पाहिले तर तुम्हाला नदी दिसणार नाही. तुम्हाला दिसेल तो शहरीकरण, प्रदूषण आणि प्रशासकीय अनास्थेचा बळी ठरलेला, कचरा आणि रासायनिक फेसाने तुडुंब भरलेला एक नाला. राम नदीची ही अवस्था नैसर्गिक नाही तर हा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केलेला पर्यावरणीय खून आहे, ज्यामध्ये योजना, आश्वासने आणि प्रत्यक्ष कृती यात मोठी तफावत आहे. नद्या कधीच अचानक गायब होत नाहीत पण रामनदीला नकाशावरून पद्धतशीरपणे पुसले जात आहे. काही सर्वेक्षणांच्या वृत्तानुसार, या नदीची रुंदी १५ टक्क्यांनी कमी झाली आहे आणि नदीचा सुमारे २० टक्के नैसर्गिक प्रवाह अतिक्रमणांमुळे गायब झाला आहे.

नदी जाते कुठे? ती टोलेजंग इमारतींच्या पायाखाली गाडली जाते. नदीच्या नैसर्गिक प्रवाहाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकण्यात आले आहे. राडारोडा, पाईप्स आणि वळवलेले प्रवाह यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे.



वरच्या भागातून वेगाने येणारे पाणी जेव्हा या अरुंद पात्रात अडकते तेव्हा नैसर्गिक ड्रेनेज ब्लॉक झाल्यामुळे पुराचा धोका कैकपटीने वाढतो. त्यात भर म्हणजे, नदीत उघडपणे विष कालवले जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, तब्बल २३ ठिकाणी कोणतीही प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट रामनदीत सोडले जात आहे. बाणेर सांडपाणी प्रक्रिया केंद्राची क्षमता वाढवण्याऐवजी, प्रशासनाने शहरातील पावसाळी गटारेच उघड्या गटारांमध्ये रूपांतरित होऊ दिली आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या पावसाळी गटारांमधूनही प्रदूषित पाणी वाहते आणि भूगाव ग्रामपंचायतीच्या भूमिगत ड्रेनेजमधून येणारे सांडपाणी या समस्येत भर घालते. या सर्वाचा थेट फटका खालील बाजूला असलेल्या पान ४ वर ▸



### नदी भोगतिये मरणयातना

रामनदी ही केवळ पाण्याचा एक प्रवाह नाही; ती या मातीची, या परिसराची जीवनवाहिनी आहे. एकेकाळी खळखळून वाहणारी आणि आजूबाजूच्या गावांची तहान भागवणारी ही नदी, आज काँक्रीटच्या विळख्यात आणि सांडपाण्याच्या दुर्गंधीत मरणयातना भोगत आहे. विकासाच्या नावाखाली आपण तिच्यावर सिमेंटचे जाळे विणून तिचा गळा घोटला आहे. तिला आता आपल्या अश्रूंची, कोरड्या सहानुभूतीची किंवा कागदी आश्वासनांची गरज नाही; तिला गरज आहे ती एका प्रामाणिक, कठोर कृतीची. तिच्या प्रवाहातील अडथळे दूर करून, तिला तिचे नैसर्गिक काठ आणि तिचे हरवलेले वैभव परत मिळेपर्यंत हा लढा थांबता कामा नये.



**घनश्याम पाटील,** ७०५७२९२०९२

# जे कराल ते सर्वोत्तम!

**लोकमान्य टिळकांच्या बाबत एक किस्सा सांगितला जातो. त्यावेळी ते मंडालेच्या तुरूंगात होते. इकडं त्यांच्या मुलानं एका परीक्षेत घवघवीत यश मिळवलं. त्यानंतर त्यांनी लोकमान्यांना पत्र लिहिलं. त्यात लिहिलं, ''माझं हे शिक्षण पूर्ण झालंय. आता पुढं काय करू?''**

त्यावर उलटटपाली टिळक लिहितात, ''पुढं काय करायचं हे तुच ठरव! पण जे काही करशील ते सर्वोत्तम कर! भलेही तू चप्पल विकण्याचा व्यवसाय कर... पण लोकांनी म्हटलं पाहिजे, चप्पल घ्यायची तर टिळकांच्या मुलाकडूनच!''

गुणवत्तेचा, दर्जाचा ध्याय घेणारे असे आज किती लोक आहेत? समाजाचं नेतृत्व करणाऱ्या धुरिणांचं सोडा! आपण आपल्या मुलांना तरी असं स्वातंत्र्य देतो का? त्यांच्यावर अपेक्षांचं ओझं किती प्रमाणात लादतो? त्या पूर्ण झाल्या नाहीत तर कुणाकुणाचं आणि किती नुकसान होतं? 'जे करशील ते सर्वोत्तम कर' असं त्याला सांगण्याचं धाडस आपल्यापैकी किती जण करतात? अगदी एखादं नवं हॉटेल सुरू झालं, तिथल्या पदार्थांची चव भन्नाट असली तरी काही दिवसातच त्याची रया गेलेली असते. एखाद्या लेखकाची एक-दोन पुस्तकं गाजली की तो ओढून-ताणून लिहायला लागतो. त्यासाठी करावे लागणारे अविरत परिश्रम त्याला नको असतात. नाव झालं की काहीही खपवता येतं असा अहंकार वाढतो आणि क्षणात सर्व काही होत्याचं नव्हतं होतं.

पंडित जवाहरलाल नेहरू हे देशाचे पंतप्रधान होते. त्यांनी महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांना फोन केला. त्यांना सांगितलं, ''तुम्हाला केंद्रीय गृहमंत्रीपदाची शपथ घ्यायचीय...''

खरंतर ही वार्ता ऐकून कोणीही हर्षोल्हासित होईल. त्याला त्याच्या आयुष्याचं सार्थक झाल्यासारखं वाटेल. इथं मात्र नेमकं उलटं घडलं. क्षणाचाही विलंब न करता यशवंतराव म्हणाले, ''मी बोलून कळवतो.''

खुद्द देशाचे पंतप्रधान एका प्रादेशिक नेत्याला त्याचं क्षितिज विस्तारण्याची संधी देत होते आणि हे म्हणत होते, ''मी बोलून कळवतो...''

इतकी मोठी संधी येत असताना आणि खुद्द पंतप्रधान सोबत असताना आणखी कुणाशी बोलायला हवं? नेहरूंनाही हा प्रश्न पडला आणि त्यांनी त्याबाबत विचारणा केली.

यशवंतराव म्हणाले, ''जिने माझ्यासोबत सुख-दुःखात राहण्याचा, मला साथ देण्याचा निश्चय केलाय त्या माझ्या अर्धांगिनीला, वेणुबाईला विचारावं लागेल... तिच्या सल्ल्याशिवाय, परवानगीशिवाय मी काहीच करत नाही...''

नेहरूंनाही आश्चर्य वाटलं. त्यांनी यशवंतरावांच्या या पत्नीप्रेमाचं, स्त्री-पुरूष समानतेचं कौतुक केलं.

आपल्या बायकोला असा सन्मान देणारे, तिच्या इच्छा-आकांक्षांचा विचार करणारे, तिला प्रेम आणि जिव्हाळ्याबरोबरच योग्य तो आदर देणारे असे किती लोक आज शिल्लक आहेत?

दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्याबाबतचाही एक किस्सा सर्वश्रुत आहे. ते त्यावेळी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य होते. दरमहा त्यांना पन्नास रूपये मानधन मिळायचं. त्यात त्यांचं घर चालायचं. एकदा एक मित्र अचानक त्यांच्याकडं आला. त्यानं सांगितलं की, ''माझ्या बायकोची तब्येत बिघडलीय. तिला डॉक्टरकडं नेणं गरजेचं आहे. शक्य तितकी आर्थिक मदत करा...''

शास्त्रीजींपुढं प्रश्नचिन्ह उभं होतं. आता काय करावं? आपल्याला जेवढं मानधन मिळतं तितक्यात घरखर्च चालतो. शिल्लक अशी काही नव्हतीच. मित्र तर संकटात आहे. त्याला मदत करणं हे आपलं कर्तव्यच आहे. काय बरं करावं?

ते विचारात असतानाच त्यांच्या पत्नी ललितादेवी घराबाहेर आल्या. त्यांनी या दोन मित्रांमधील संवाद ऐकला होता. ललितादेवींनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना पन्नास रुपये दिले. मित्र निघून गेला.

शास्त्रीजींना कळत नव्हतं की हे पैसे आले कुठून? त्यांनी त्याबाबतची विचारणा केली. तेव्हा ललिताबाई म्हणाल्या, ''तुम्ही दरमहा तुमचे पन्नास रूपये मानधन मला घरखर्चासाठी देता. दरमहा मी पंचेचाळीस रूपयांत घर भागवते आणि उरलेले पाच रुपये बचत करते. एखाद्याच्या अडचणीला हे पैसे आले नाहीत तर त्यांचा काय उपयोग? म्हणून ते मी त्यांना दिले...''

शास्त्रीजींना त्यांच्या पत्नीचा अभिमान वाटला. त्यांनी ललिताबाईंचं कौतुक केलं. इतरांची सहवेदना अनुभवण्याइतकी संवेदनशीलता त्यांच्याकडं आहे याचं त्यांना अप्रूप वाटलं. ललिताबाई आतल्या खोलीत वळल्या आणि शास्त्रीजींनी काँग्रेस वर्किंग कमिटीला पत्र लिहिलं, ''माझं घर दरमहा पंचेचाळीस रूपयात चालतं. पाच रुपये जादा येत असल्यानं माझी पत्नी त्याची बचत करत आहे. असलेला पैसा चलनात असावा आणि गरजेपुरताच पैसा सोबत ठेवावा या विचाराचा मी असल्यानं या महिन्यापासून माझे वाचवलेले पाच रुपये कमी करावेत आणि ते अन्य गरजूंना द्यावेत.''

सदैव राष्ट्रसेवेसाठी तत्पर असलेल्या अशा देशभक्तांचं हे वागणं आज अनेकांना खुळेपणाचं वाटू शकेल. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर ज्याला 'सद्गुण विकृती' म्हणायचे ती यापेक्षा वेगळी थोडीच असते? आज असे किती लोक आपल्या आजूबाजूला आहेत बरं? नसतील तर यात दोष कुणाचा? आदर्शाची ही महान परंपरा नेमकं कुणामुळं, कशी आणि का खंडित झाली असावी?

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबाबतचीही एक छान गोष्ट आहे.

ते आश्रमात होते. त्यावेळी एक गृहस्थ त्यांच्याकडं आले. बापूजींचं सूतकताईचं काम सुरू होतं. ते म्हणाले, ''बापूजी मी एक उद्योजक आहे. भरपूर पैसा कमावला. मुलं मार्गी लागलीत. सारं काही करून झालंय. त्यामुळं आता मला देशसेवा करायचीय. आपण मला मार्गदर्शन करा. मी नेमकं काय करू शकतो?''

बापूजी म्हणाले, ''माझं हातातलं हे काम पूर्ण होईपर्यंत तुम्ही बसा. मग आपण चर्चा करू!''

ते गृहस्थ बाजूला जाऊन बसले. गांधीजींचं काम सुरूच होतं. पाच मिनिटं, दहा मिनिटं, अर्धा तास, पाऊण तास...

या महाशयांना अशी कुणाची वाट पाहण्याची सवय नव्हती. त्यामुळं त्यांची अस्वस्थता वाढत चालली होती.

थोड्या वेळानं बापूजी जवळ आले. म्हणाले, ''माफ करा. माझं काम सुरू होतं. आता बोला. काय म्हणालात?''

ते गृहस्थ म्हणाले, ''मला देशसेवा करायचीय. काहीतरी काम सुचवा.''

गांधीजी म्हणाले, ''भल्या गृहस्था, मी सुतकताई करत होतो तेव्हा माझं लक्ष तुमच्याकडेच होतं. तुम्ही माझी वाट पाहताना चार वेळा या जागेवरून उठलात. या माठातलं ग्लासभर पाणी घेतलंत. अर्धा ग्लास पाणी तुम्ही प्यालं आणि अर्धा ग्लास टाकून दिला. यापुढं एक काम करा. जेवढी तहान असेल तितकंच पाणी ग्लासात घ्या. इतकं जरी प्रामाणिकपणे केलंत तरी तुमच्या हातून राष्ट्राची खूप मोठी सेवा घडेल. या आता...''

त्यांचे हे विचार आपण किती जण आचरणात आणतो? ज्या गोष्टी गरजेच्या नाहीत अशा किती गोष्टी टाळतो? जे सहजशक्य आहे तेही करताना आपण अक्षम्य हलगर्जीपणा, दुर्लक्ष का बरं करतो? आपल्याला आणखी वेगळे आदर्श कसले हवेत?

आता थोडंसं मागं जाऊया.

तो काळ होता महाभारताचा. पांडव वनवासात होते. तहानेनं व्याकुळलेले असताना एका डोहात पाणी आणण्यासाठी एकेक जण जात होते. त्यांना तिथून यक्षाचा आवाज येत होता. काही प्रश्न विचारले जात होते. तो आवाज न ऐकल्यावर, त्याच्या प्रश्नाला उत्तरं देता न आल्यावर एकेक जण मूर्च्छित होऊन पडत होता. सगळे जण पाणी आणायला जाऊनही एकही परतला नाही म्हणून शेवटी न्यायप्रिय युधिष्ठिर तिकडं गेले. त्यांनाही यक्षाचा आवाज आला. त्यांना विचारलं गेलं, ''जगात सर्वात श्रेष्ठ कोण?''

युधिष्ठिराकडून उत्तर आलं, ''ब्राह्मण!''

मग अर्थातच पुढचा प्रश्न आला. ''खरा ब्राह्मण कोण?''

युधिष्ठिरानं सांगितलं, ''जो न्याय, नीतीनं वागतो, ज्याची ज्ञानाची लालसा आहे, ते ज्ञान जो इतरांना देतो, जो धनसंचय करत नाही तो खरा ब्राह्मण.''

पुढचा प्रश्न आला, ''हे गुण एखाद्या ब्राह्मणात नसतील तर?''

युधिष्ठिरानं क्षणाचाही विलंब न करता सांगितलं, ''मग तो खरा शूद्र!''

''आणि एखाद्या शूद्रात हे गुण असतील तर?''

युधिष्ठिर महाराज म्हणाले, ''मग तो शूद्र कसा राहील? तोच खरा ब्राह्मण!''

या व अशा संवादानंतर यक्ष खूश झाला. त्यानं सांगितलं, ''मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तू योग्य उत्तरं दिल्याबद्दल मी तुझ्या दोन भावाला शुद्धीत आणतो. कुणाला ते तू ठरवं आणि सांग.''

यक्षाला अर्थातच अपेक्षित होतं की तो सर्वशक्तीमान भीम आणि अर्जुनाला शुद्धीत आणायची विनंती करेल. या लढाईत त्या दोघांची खरी गरज आहे.

युधिष्ठिरांनी सांगितलं, ''आपण नकुल आणि सहदेवाला शुद्धीत आणावं...''

आता आश्चर्यचकित व्हायची वेळ यक्षाची होती. त्यानं त्याचं कारण विचारलं. युधिष्ठिर म्हणाले, ''जे दुर्बल आहेत त्यांना आपण उभं करायला हवं. जे सबल आहेत त्यांना थोडा त्रास झाला तरी ते त्यांच्या क्षमतेच्या बळावर उभे राहतील...''

यक्षानं युधिष्ठिराच्या या समतोल बुद्धीचा मान राखत सर्वांनाच शुद्धीत आणलं.

आज आपली 'शुद्ध' जागेवर आहे का? दुर्बलांना सबल करण्यासाठी आपण काय करतोय? राजकीय घोषणाबाजी काय होते? लोककल्याणकारी राज्याच्या नावावर कुणाकुणाला कसे अडवले जाते, नागवले जाते हे आपण पाहतोच आहोत. 'बळी तो कान पिळी' असा जणू अलिखित नियमच झालाय. मग दुर्बलांचं काय? त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेमकं काय करता येईल? सध्या आपण सर्व एका अराजकाकडं निघालोय. प्रत्येकाला आपलंच दुःख मोठं वाटतंय. ते गोंजारताना ना आपल्यात सहवेदना अनुभवण्याची ताकत उरलीय ना आपल्यात विश्वात्मक विचार उरलाय.

आदर्शांचे जे काही मनोरे उभारलेत त्याचे इमले ढसढसा कोसळत आहेत. देव, देश आणि धर्माच्या विरूद्ध वागण्याला प्रतिष्ठा मिळतेय. एकीकडं महासत्तेची स्वप्नं पाहताना दुसरीकडं आपण आपलं जे 'अस्सल' आहे तेच निकालात काढायला निघालोय. या सगळ्याचा विचार व्हायला हवा. जे परिस्थितीनं आणि विचारानं 'दुर्बल' आहेत ते सबल झाले तर आणि तरच हे चित्र पालटू शकेल. ती क्षमता सर्वांत जागृत होवो इतकीच अपेक्षा!

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# जाचक कायद्यांतून शेतकरी मुक्त करा : डॉ. राऊत

## महाबळेश्वर जवळच्या दाभे मोहन येथे १४वे अ. भा. शेतकरी साहित्य संमेलन उत्साहात



**महाबळेश्वर, (प्रतिनिधी) :** ''देशाचा कणा असलेला शेतकरी आज सरकारी धोरणांमुळे सर्वार्थाने उद्ध्वस्त झाला आहे. सिलिंग कायदा, जीवनावश्यक वस्तू कायदा, जमीन अधिग्रहणासारखे कायदे शेतकऱ्यांच्या पायातील साखळदंड आहेत. हे कायदे रद्द होत नाहीत, तोपर्यंत शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार नाही,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध शेतीसाहित्य अभ्यासक व समीक्षक डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी केले.

व्योमव्यापी फाउंडेशन, पुणे आणि शेती अर्थ प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने महाबळेश्वर जवळच्या दाभे मोहन या गावी १४ वे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन पार पडले, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रगतशील शेतकरी किसनसेठ भिलारे हे या संमेलनाचे उद्घाटक होते. 'साहित्य चपराक'च्या ज्येष्ठ उपसंपादिका, साहित्यिक आणि उद्योजिक सौ. चंद्रलेखा जगताप-बेलसरे ह्या स्वागताध्यक्ष होत्या. इंडियाना सुक्रो- टेक पुणे प्रा. लि.चे कार्यकारी संचालक प्रमोदकुमार बेलसरे संयोजक म्हणून तर मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ सतीश बोरुलकर आयोजक होते.

''कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याची, शेतीमधील प्रत्यक्ष उद्यमशीलतेच्या वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला जखडणाऱ्या मानवनिर्मित बेड्यांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव झाली पाहिजे. नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध झाल्या पाहिजेत. मराठी साहित्य सारस्वतांची कृषी-उद्योग जगतासोबत सांगड घालणे, त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करणे आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवणे, शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणणे यासाठी शक्तिशाली, सर्जनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी म्हणून हे संमेलन होत असते,'' अशी भूमिका कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी मांडली.

### पापी पेट का सवाल

**१४ व्या अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलनात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी 'पापी पेट का सवाल' या विषयावर कथाकथन केले. आवर्षणग्रस्त शेतकरी संकटात सापडतो, पोट भरण्यासाठी शहरात रसवंतीगृह चालवतो, संकटांची मालिका झेलत राहतो पण अंगी असलेला प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि माणुसकी सोडत नाही. जीवनाचा एक मूलमंत्र तो जगताला देतो, यावर भाष्य करणारी कथा देशमुख यांनी सादर केली.**

कोयना नदीच्या पात्रातून नावेमधून एका अभिनव पद्धतीने ग्रंथ दिंडीने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मराठी गौरवगीत, दीप प्रज्वलन, छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून आणि शेतकरी नेते स्व. शरद जोशी याच्या प्रतिमेला पुष्पहार घालून, शेतकरी नमनगीत म्हणून ह्या सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी निमंत्रीत शेतकरी साहित्यिक, कवी प्रचंड संख्येने उपस्थित होते. दाभेमोहन ह्या गावचे आणि परिसरातील अनेक गावांचे ग्रामस्थदेखील उपस्थित होते. त्यांचा सहभाग उत्साहवर्धक होता.

यावेळी रवींद्र दळवी यांच्या 'दिवाबत्ती' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. दुपारच्या सत्रात तंत्रज्ञानाच्या कसोटीवर शेती उत्थानाची दिशा ह्या विषयावर परिसंवाद आयोजित केला गेला तर

> जगात कोणताही उत्पादक त्याच्या उत्पादनाची किंमत स्वतः ठरवितो. त्या उत्पादनाला किती खर्च आला? याचा हिशोब करून त्यात आपला नफा मिळवून मगच आपल्या उत्पादनाची विक्रीची किंमत ठरवितो पण आपल्या शेतकरी बांधवाला आपल्या उत्पादनाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही. त्याची काही सूत्रे आमच्या सरकारच्या हाती आहेत तर काही अधिकार व्यापाऱ्यांच्या हाती एकवटले आहेत. बराचसा शेतीमाल हा नाशवंत असल्यामुळे मिळेल त्या भावात शेतकऱ्याला आपले उत्पादन विकावे लागते. त्यामुळे त्याचा उत्पादन खर्च तर निघतच नाही पण वाहतूक खर्च देखील निघत नाही. म्हणूनच आजची युवा पिढी शहरात जाऊन नोकरी किंवा काही उद्योग करण्याकडे आकर्षित झालेली दिसते.
>
> **– सौ. चंद्रलेखा बेलसरे-जगताप,** स्वागताध्यक्ष

> खऱ्या अर्थाने कृषी, ग्रामीण, सहकार, साहित्य, शेतकऱ्यांच्या व्यथा- कथा, त्यांचा खरा संघर्ष, त्या प्रक्रियेमधून जात असताना त्यांच्या मनःस्थितीचे शब्द, काव्य, कथाकथन स्वरूपात मांडून एक बहुउद्देशिय चर्चा विभिन्न विषयावर घडवून आणली. अशाप्रकारे ग्रामीण, कृषी, समाज आणि सहकार या सर्व क्षेत्रांना साहित्याच्या माध्यमातून एकत्र आणण्याचा निरंतर प्रयत्न शेतकरी साहित्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, यात कुठलीच शंका नाही.
>
> **– प्रमोदकुमार बेलसरे,** संयोजक

> महाबळेश्वरच्या पश्चिम भागात स्ट्रॉबेरीचे पीक अतिशय चांगले येत असून येथील शेतकरी सधन आहे. पूर्व भागात मात्र काही कारणांनी ते पीक चांगले येत नाही. म्हणून या भागातील रहिवाश्यांनी शेळीपालन, गोपालन, दुग्ध व्यवसाय, बांबू लागवड केल्यास बऱ्याच समस्यांचे निराकरण होऊ शकते. शैक्षणिकरित्या इंजिनीअर असलेल्या मला ऑस्ट्रेलियामध्ये नोकरीची चांगली संधी चालून आलेली असताना सुद्धा वडिलांच्या सांगण्यावरून शेती हा व्यवसाय सुरू केला आणि पश्चिम भागातील शेतकऱ्यांचा स्ट्रॉबेरीचा व्यवसाय जवळजवळ ३०० कोटीपर्यंत नेला.
>
> **– किसनशेठ भिलारे,** संमेलनाचे उद्घाटक आणि प्रगतशील शेतकरी

संध्याकाळच्या सत्रात शेतकरी कवी संमेलन आणि कथाकथन हे कार्यक्रम सादर केले गेले. रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अक्षांशस्वर, दिव्यदृष्टी कलाकार, मुंबई ह्या कलाकारांनी 'सह्याद्रीची शौर्यगाथा' हा पारंपरिक जागरण आणि गोंधळाचा सांगीतिक कार्यक्रम सादर केला.

दुसऱ्या दिवशीच्या परिसंवादात शेती आणि संत वाङ्मय ह्या विषयावर मान्यवरांनी सहभाग घेतला. अतिशय सुंदर असा शेतकरी गझल-मुशायरा या ठिकाणी प्रस्तुत करण्यात आला. शेतकरी गर्जन गीताने ह्या संमेलनाचा समारोप संपन्न झाला. या दोन दिवसीय शेतकरी साहित्य संमेलनाला अनेक दिग्गजांची उपस्थिती आणि महाबळेश्वरसारख्या दुर्गम भागातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे आकर्षणाचे केंद्र होते. यापूर्वी कोल्हापूर, मुंबई, नाशिक, यवतमाळ, वर्धा, अमरावती, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी संपन्न झालेल्या शेतकरी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या ह्या पवित्र भूमीत संपन्न झालेले हे संमेलन नेत्रदीपक आणि अभूतपूर्व असेच म्हणावे लागेल. देशाचा कणा आणि समस्त मानवजातीचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचे दुःख, त्यांचा संघर्ष, होणाऱ्या हालअपेष्ठा, आजच्या शेतीची अवस्था, बळीराजाची भूमिका, होणाऱ्या आत्महत्या, सरकारी धोरणे यावर या संमेलनातून प्रकाश टाकण्यात आला.

शेतीविषयक तज्ज्ञ आणि कवितेतून शेतकऱ्यांच्या भावना मांडणारे शेतकरी कवी, लेखक, साहित्यिक उपस्थित होते. त्यांच्या अभिव्यक्तीतून शेतीविषयक समग्र इतिहास, शेतीचे मानवी जीवनातील महत्त्व, शेतकऱ्यांची आजची स्थिती ह्या सर्व विषयावर चर्चा झाली. कार्यक्रम चे सूत्रसंचालन रमेश खांडेभराड यांनी केले तर प्रमोदकुमार बेलसरे यांनी आभार मानले.







◀ पान १ वरून

पाषाण तलावाला बसत असून त्याचीही परिसंस्था नष्ट होत आहे. तसेच नदीकाठी घनकचरा टाकण्याचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे.

रामनदीच्या दुर्दशेचे एक प्रमुख कारण म्हणजे प्रशासकीय अधिकारांचा गोंधळ. नदीचा १९.५ किलोमीटरचा प्रवास भूगाव आणि भुकूमसारख्या ग्रामपंचायतींमधून सुरू होतो. यापैकी केवळ ८ किलोमीटरचा पट्टा पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत येतो. उर्वरित भाग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद आणि स्थानिक ग्रामपंचायतींच्या अखत्यारित विभागला गेला आहे.

या अधिकार क्षेत्रांच्या गुंतागुंतीमुळे नदीचे एकात्मिक व्यवस्थापन होऊ शकलेले नाही. सांडपाण्याची सोय नसतानाही दिल्या गेलेल्या बांधकाम परवानग्यांमुळे अतिक्रमणांना मोकळे रान मिळाले आहे. पुणे महानगरपालिकेकडे या नदीसाठी कोणताही एक स्वतंत्र समन्वयक नाही किंवा धोका निवारण समिती देखील नाही.

रामनदीला वाचवण्यासाठी केवळ आश्वासनांची नव्हे तर तातडीने सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (एसटीपी) उभारण्याची, नदीपात्र रुंद करण्याची आणि कचरा टाकण्यावर कडक बंदी आणण्याची गरज आहे. पूरेषेचे संरक्षण करण्यासाठी दीर्घकालीन झोनिंग आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सर्व प्रशासकीय संस्थांना एकत्र आणणारे एक एकात्मिक प्राधिकरण आणि नागरिकांचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. पुण्याचा विकास हा नद्यांच्या मृत्युवर उभा राहू शकत नाही. रामनदीचे पुनरुज्जीवन ही पुण्याच्या शाश्वत विकासाची खरी परीक्षा आहे.

राष्ट्रीय हरित लवादाचा दणका आणि हजारो नागरिकांचा आक्रोश यानंतर आता खरा प्रश्न उभा राहतो तो प्रत्यक्ष अंमलबजावणीचा. केवळ कागदावर समित्या नेमून, बैठका घेऊन किंवा मुदती देऊन मरणपंथे लागलेल्या नद्या पुन्हा जिवंत होत नाहीत. त्यामुळे प्रशासन आणि व्यवस्थेला आता काही थेट प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतील.

पुढचा ठोस कृती आराखडा नक्की काय आहे? सांडपाणी प्रक्रिया केंद्रे आणि ड्रेनेज नेटवर्कचे काम प्रत्यक्षरित्या कधी सुरू होणार? अतिक्रमणांवर कारवाई कधी? नदीचा नैसर्गिक प्रवाह रोखणाऱ्या इमारती आणि शमन उपाय म्हणून उभारलेल्या काँक्रिटच्या रिटेनिंग वॉल्सवर प्रशासनाचा हातोडा कधी पडणार? रामनदी मोकळा श्वास कधी घेणार?

जर आज आपण तिला वाचवले नाही तर उरेल तो फक्त एक कोरडा, विषारी नाला आणि पश्चात्ताप! तिला आपली गरज नाही तितकी आपल्याला तिची आहे. एक रामनदी नष्ट झाली तर निसर्गाला कुठे ना कुठे जरूर पान्हा फुटेल, पुन्हा एक रामनदी जन्म घेईल! पण ती आपल्या इथे नक्कीच नसेल हे मात्र निश्चित!!



## नियमांचा दिखावा – पर्यावरण मंजुरीचा फार्स

हे सर्व दिवसाढवळ्या कसे घडते? मरणपंथे लागलेल्या नदीच्या पात्रात टोलेजंग इमारती कशा उभ्या राहतात? याचे उत्तर नोकरशाहीच्या खेळात दडलेले आहे. अशी कागदपत्रे पर्यावरणीय विनाशाला कायदेशीर मंजुरी देतात. रामनदीच्या अगदी काठावर उभ्या राहणाऱ्या मोठ्या प्रकल्पांना दिल्या जाणाऱ्या पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्रातील एक विशिष्ट अट क्र. ९ पाहा –

''समितीने नोंदवले आहे की, प्रस्तावित प्रकल्प रामनदीला लागून आहे, त्यामुळे समितीने सुचवले आहे की प्रकल्प विकासकाने शमन उपाय वाढवावेत आणि नदीच्या बाजूने रिटेनिंग वॉल (संरक्षक भिंत) बांधावी. शिवाय प्रस्तावित प्रकल्पामुळे कोणतेही जंगल किंवा वन्यजीव विस्थापित होत नाहीत, वृक्षतोड होत नाही आणि कोणत्याही न्यायालयात यासंबंधी खटला प्रलंबित नसल्याचेही समितीच्या निदर्शनास आले आहे.''

ही अट अत्यंत बारकाईने वाचली तर यात अनेक त्रुटी आहेत.

पहिली गोष्ट, रिटेनिंग वॉल हा उपाय कसा? नैसर्गिक जलस्रोताच्या बाजूने एक उभी काँक्रीटची भिंत बांधणे हा पर्यावरणीय हानी टाळण्याचा उपाय कधीपासून झाला? नदीला तिचे नैसर्गिक काठ लागतात – जिथे माती, गवत आणि वनस्पती पुराचे पाणी शोषून घेतात आणि जैवविविधतेला आधार देतात. रिटेनिंग वॉलमुळे जिवंत नदीचे रूपांतर एका निर्जीव काँक्रीटच्या कालव्यात होते.

दुसरी गोष्ट, 'वृक्षतोड नाही' आणि 'वन्यजीव बाधित नाही' हा दावा. हा निव्वळ दिशाभूल करणारा प्रकार आहे. जोवर एखादा विकसक नदीच्या उद्ध्वस्त झालेल्या काठावर मंजुरी मागतो, तोपर्यंत तिथली मूळ वनस्पती उदा. लव्हाळे, झुडपे आणि स्थानिक पक्ष्यांची घरटी इ. एकतर आधीच पद्धतशीरपणे नष्ट केलेली असतात किंवा त्यांना खुजे जंगल ठरवले जाते.

तिसरी गोष्ट, 'कोणताही खटला प्रलंबित नाही' हे विधान. जेव्हा राष्ट्रीय हरित लवादाला (एनजीटी) ला रामनदीच्या विनाशाबाबत वारंवार हस्तक्षेप करावा लागला आहे, तेव्हा समित्या कोणताही खटला प्रलंबित नसल्याचा दावा कसा करू शकतात?

ही अट नदीचे रक्षण करत नाही; ती बिल्डरला वाचवणारी नोकरशाहीची ढाल आहे. यातून एक उद्विग्न करणारा प्रश्न निर्माण होतो की आपल्या पर्यावरण समित्या खरोखरच नदीच्या परिसंस्थेच्या अस्तित्वाचे मूल्यमापन करत आहेत, की केवळ वेळेवर काँक्रिट ओतले जावे यासाठी रकाने भरण्याचे काम करत आहेत? जेव्हा तुम्ही संरक्षक भिंत बांधून नदीचे नैसर्गिक पूरक्षेत्र हिरावून घेता, तेव्हा नदीला तुमच्या घरात शिरण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. ऑगस्ट २०१९ चा विनाशकारी पूर हा रामनदीचा काँक्रिटच्या पिंजऱ्यात गुदमरून केलेला आक्रोश होता. या विनाशकारी पुरानंतर, पर्यावरणतज्ज्ञांनी तयार केलेल्या पूरमुक्त रामनदी २०२० अहवालात पुणे महानगरपालिकेला नदीपात्रातील राडारोडा आणि पाईप्स तातडीने हटवण्याची आणि नदीचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याची विनंती करण्यात आली. परंतु, जिथे सरकारने अनास्था दाखवली, तिथे पुणेकरांनी नदीबद्दलचे अथांग प्रेम दाखवले. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, रामनदी पुनरुज्जीवन मिशन अंतर्गत किर्लोस्कर वसुंधरा आणि इतर संस्थांच्या पाठिंब्याने १५,००० हून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. त्यांनी खटपेवाडी तलावावर जाऊन गाळ काढला, स्थानिक झाडे लावली आणि नदीच्या उगम स्थानात पुन्हा प्राण फुंकण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे (नकाशावर आणलेले सांडपाणी सोडण्याचे मार्ग, आंदोलने आणि याचिका) अखेरीस प्रशासनाला झुकावे लागले. पुणे मिरर आणि टाइम्स ऑफ इंडियाने नोंदवल्याप्रमाणे, राष्ट्रीय हरित लवादाच्या पुणे खंडपीठाने पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सांडपाणी व्यवस्थापन आणि नदी स्वच्छ करण्यासाठी सहा महिन्यांची कठोर मुदत दिली. लवादाने स्पष्ट केले की, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण केवळ नियोजन प्राधिकरण राहू शकत नाही; त्यांनी मंजूर केलेल्या प्रकल्पांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांसाठी पायाभूत सुविधा उभारणे हे त्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे. तसेच खंडपीठाने सांडपाणी आणि पावसाळी पाणी वेगळे करण्याचे आदेश दिले असून, नदीकाठी कचरा टाकणाऱ्यांवर थेट एफआरआय दाखल करण्याचे निर्देशदेखील दिले आहेत. एवढे असूनही स्थानिक रहिवासी, पुलावरून येणारे जाणारे इ. नदीपात्रात सर्रास कचरा टाकताना दिवसाढवळ्या दिसत आहेत.

# निरोगी मन अन् सुदृढ शरीर हेच जीवनध्येय

**हवेली पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक असलेले संतोष कुंभार हे एक कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत. पौड, वेल्हा, हवेली असे तीन पोलीस ठाणे त्यांच्या कार्यालयाअंतर्गत येतात. समाज मनाने आणि शरीराने निरोगी असावा, असा त्यांचा कायम आग्रह असतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून स्वतःला सिद्ध करतानाच त्यांनी आरोग्य राखले आहे. गुन्हेगारांवर वचक निर्माण करतानाच त्यांच्या आंतर्बाह्य बदलास हातभार लावणाऱ्या कुंभार यांच्याशी प्रमोद येवले यांनी साधलेला हा संवाद.**





पुरंदर किल्ल्याच्या तळाशी असलेलं काळदरी हे छोटंसं गाव. सह्याद्रीच्या पर्वतरांगातील या गावात जेमतेम शंभर-दीडशे उंबरे असतील. तरीही या गावाला बारा वाड्या. इथलं पंढरीनाथ कुंभार आणि सुभद्राबाई कुंभार हे दाम्पत्य मुंबईत कामासाठी स्थिरावलं. गिरणी कामगारांचा संप सुरू झाला आणि सगळं क्षणात होत्याचं नव्हतं झालं. कुंभार कुटुंबियांना परत काळदरीला यावं लागलं. त्यांनी परंपरागत कुंभारकाम सुरू केलं. रोजगार हमीवर कामं केली. टेलरिंगचा व्यवसाय केला. इतकंच काय गोबरगॅस दुरूस्तीची कामंही केली. या सगळ्या वातावरणात दारिद्र्यावर मात करायची इच्छा मनी बाळगणाऱ्या त्यांच्या चिरंजीवाच्या मनात स्वतःला सिद्ध करण्याची ठिणगी पेटली. परिणामी त्यांनी अपार परिश्रम घेतले आणि आज पोलीस दलात एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कर्तव्य बजावत आहेत. ही संघर्षकथा आहे संतोष कुंभार यांची. प्रतिकूलतेवर मात करत त्यांनी स्वतःचं विश्व तर घडवलं आहेच पण अनेकांच्या आयुष्यातही आशेचे, आनंदाचे, स्वप्नपूर्तीचे नंदादीप पेरले आहेत.

संतोष कुंभार दहा-बारा वर्षाचे असताना कधीतरी एसटी बसने पुण्याला यायचे. त्यावेळी इथले टुमदार बंगले पाहून त्यांना वाटायचं, आपलंही असं घर असावं. इथल्या रस्त्यावर बेफाम धावणाऱ्या आलिशान गाड्या पाहून त्यांना वाटायचं, आपल्याकडेही अशी गाडी असावी! बालपणी बघितलेली ही स्वप्नं पूर्ण करायची तर कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही, हे त्यांना उमगलं होतं. वडील गायी चारायला न्यायचे. त्यावेळी त्या गायीच्या पाठिवर एखादी काठी आडवी धरून ते गोळ्या झाडल्याचा अभिनय करायचे. आपण पोलिस झालो तर गुन्हेगारांचा कर्तनकाळ होऊ, ही भावना त्यामागे असायची. सैन्यात गेलो तर देशाची सेवा करता येईल, हा विचार असायचा. वयाच्या बाराव्या वर्षी बघितलेलं हे स्वप्न एकवीशी ओलांडल्या ओलांडल्या पूर्ण झालं. राज्य राखीव दल ग्रुप १ रामटेकडी, पुणे यांच्याकडून त्यांना बोलावणं आलं.

त्यापूर्वी गावात ते वडिलांना टेलर कामात मदत करायचे. कपडे शिवण्यात त्यांचा हातखंडा होता. 'संतोष टेलर' अशी ओळख गावभर निर्माण झाल्यानं लग्नाचं स्थळ चालून आलं. दरम्यान छोट्या बहिणीचंही लग्न झालं. संतोष यांना आध्यात्माची आवड असल्यानं ते कायम देवाच्या आळंदीला जायचे. घरच्यांना वाटलं, पोरगं संन्याशी व्हायला नको! त्यामुळं त्यांनी लग्नाचं मनावर घेतलं आणि ते लग्नाच्या बेडीत अडकले.

या सगळ्या धामधुमीतही त्यांचा व्यायाम नियमित सुरू होता. थेट मांढरपर्यंत म्हणजे तेरा किलोमिटर पळत जायचं आणि तितकंच अंतर पुन्हा पळत यायचं असा त्यांचा क्रम सुरू झाला. पत्नी सौ. शीतल यांचा नर्सिंगचा कोर्स सुरू होता. त्या आपल्या पतीदेवाचा अभ्यास घ्यायच्या. नित्यनेमानं व्यायाम, रोज प्यायला गायीचं नीरसं दूध, अभ्यास असं सुरू असतानाच पोलीस दलात नेमणूक झाली. राज्य राखीव दलात त्यांनी पंधरा वर्षे सेवा केली. कुंभमेळ्यात झालेली चेंगराचेंगरी असेल, कुठे उसळलेली दंगल असेल, पूर आलेला असेल अशा कोणत्याही संकटप्रसंगी त्यांना कर्तव्यावर जावं लागायचं. गडचिरोलीसारख्या भागात सलग सहा-सहा महिने काम करतानाचे त्यांचे अनुभव विलक्षण आहेत. राज्य राखीव दलाचे सूत्रच असते, 'कमी तिथे आम्ही!' जी जबाबदारी स्वीकारली होती, त्यातून जिवंत परत येऊ की नाही याचीही कसलीच शाश्वती नसायची! पण 'सद्रक्षणाय खलनिग्रहनाय' हे पोलीस खात्याचं ब्रिद त्यांच्या अंगात मुरलं होतं.

पंधरा वर्षे असे काम केल्यानंतर सरकारच्या धोरणानुसार राज्य राखीव दलातून त्यांची जिल्हा पोलीस दलात अंतर्गत बदली झाली आणि ते 'माणसा'त आले. आणखी एक गोष्ट आवर्जून नमूद केली पाहिजे. त्यांच्या घरात गावाकडील आर्थिक दुर्बल घटकातील किमान दहा-बारा तरूण कायम मुक्कामी असायचे. आपणही पोलीस दलात भरती व्हावं, ही स्पप्नं उराशी घेऊन आलेल्या या तरूणांना कुंभार दाम्पत्यानं मायेनं स्वीकारलं. त्यांची घरीच निवासाची, भोजनाची व्यवस्था केली. संतोष कुंभार स्वतः त्यांचा अभ्यास घ्यायचे. कठोर शब्दात त्यांना वेळोवेळी समज द्यायचे. त्यांचं पालकत्व स्वीकारताना त्यांनी या तरूणांना प्रेरणा देण्याबरोबरच त्यांच्या परिस्थितीची, कर्तव्याची जाणीव करून दिली. कुणाकडूनही एक रूपया न घेता कठोर सराव घेतला. म्हणूनच त्यांच्या घरी राहून शिकलेले अनेक जण आज पोलीस खात्यात अधिकारी, कर्मचारी झाले आहेत. सगळ्यांना सोबत घेऊन जायचा त्यांचा हा गुण त्यामुळेच महत्त्वाचा ठरतो.



संतोष कुंभार म्हणतात, ''राज्य राखीव दलात असताना सामान्य माणसाशी कसलाच संपर्क नव्हता. नक्षलवादी, दहशतवादी असं आव्हान असायचं. दंगली नियंत्रित कराव्या लागायच्या. ग्रामीण पोलीस दलात मात्र वेगळंच चित्र होतं. पौड पोलीस ठाण्यात बदली झाली आणि गुन्हेगारांचा मुळशी पॅटर्न कळला. दर आठ-पंधरा दिवसाला कुणाचा तरी खून व्हायचा. रक्ताच्या थारोळ्यात पडलेलं धडाडतं हृदय बघावं लागायचं.'' आध्यात्माची पार्श्वभूमी असल्यानं मन आणि वृत्ती शांत होती. इथल्या गुन्हेगारीचं स्वरूप पाहता त्यांना ठरवून कठोर व्हावं लागलं. गुन्हेगारावर वचक बसवायचा तर शांत राहून चालणार नाही, हे त्यांना उमगलं. सामाजिक भान ठेवून आजवर तब्बल बत्तीस वेळा रक्तदान करणारे संतोष कुंभार म्हणतात, ''एखाद्यावर वार झालेले आहेत, तो रक्ताच्या थारोळ्यात पडलाय, पूर्ण प्रयत्न करूनही आपण त्याला वाचवू शकत नाही, आपल्या डोळ्यासमोर हा मरणार हे पाहणं खूप वेदनादायी असतं. टोळीयुद्धात अशी माणसं मारली जाणं, एकमेकांच्या जिवावर उठणं हे नक्षलवादापेक्षा कमी नाही. अनेक जण सांगतात, आम्ही आमच्या कामात इतके गुंतलोय की, मरायलाही वेळ नाही. अरे, मरायला वेळ नसेल तुमच्याकडे पण मरणाला वेळ नाही हे लक्षात घ्या. मृत्यू कधी सांगून येत नाही. त्यामुळे या सुंदर आयुष्याचा काही तरी सकारात्मक कामे करण्यासाठी उपयोग करा.''

आपल्यासमोर काही चुकीचं घडणं, राजकीय दबाव अनुभवावा लागणं, जेवणाच्या वेळा निश्चित नसणं, पुरेशी झोप न मिळणं यामुळं तब्येत बोलायला लागली. थोडी ढेरी सुटली. आळस अंगात भिनायला लागला. पायऱ्या चढतानाही दम लागायला लागला. मग त्यांनी ठरवलं की, पोलिस असा लेचापेचा असू नये. आधी आपण आपली तब्येत पूर्ववत करायला हवी. मग पिरंगुट येथील सामाजिक कार्यकर्ते महादेवअण्णा गोळे यांनी क्रॉस फिट ही जिम सूचवली. तिथं गेल्यावर त्यांचा व्यायामाचा अहंकार गळून पडला. आपल्याला खूप मेहनत घ्यावी लागणार आहे, हे जाणवलं. मग त्यांनी तसं नियोजन सुरू केलं. जिम ट्रेनर अभिजित चौधरी यांनी त्यांचा व्यायाम घ्यायला सुरूवात केली. ''आपण लग्न केलं, संसार केला, परमेश्वरानं दोन गोंडस मुलं आपल्या पदरात घातली, मनासारखं घरही उभं केलं पण आरोग्य हातून निसटतंय, याची जाणीव झाली आणि आपण खाडकन जागेवर आलो'' असं ते सांगतात. मग त्यांना जणू व्यायामाचं व्यसनच जडलं. त्यांनी आहाराचं नियोजन केलं. काहीही झालं तरी रोजचा व्यायाम चुकवायचा नाही, असा दृढ संकल्प केला. अत्यंत परिश्रमपूर्वक झपाट्यानं वजन कमी केलं. म्हणूनच आज हा पन्नाशीकडे वाटचाल करणारा गडी एखाद्या कॉलेजकुमारापेक्षाही रूबाबदार आणि देखणा दिसतो. त्यांचे सहकारी, अधिकारी, कर्मचारी, मित्र अशा सगळ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेत व्यायामाची सुरूवात केली आहे. 'आरोग्य कसं असावं? तर संतोष कुंभार यांच्यासारखं!' असं अभिमानानं सांगितलं जातं. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव नकुल यांनी कायद्याचे शिक्षण घेऊन वकिली सुरू केली आहे. ते गायनातही संगीत विशारद आहेत. धाकटा मुलगाही उत्कृष्ट तबला वाजवतो. तो आता बीबीए करत आहे.

रोजचा व्यायाम, आध्यात्मिक साधना आणि गोड पदार्थांची आहारातून केलेली कायमची सुट्टी यामुळे माझं जीवन पूर्णपणे बदललं, असं सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचं जे तेज झळकतं! ते त्यांच्या यशस्वी कर्तबगारीवर शिक्कामोर्तब करतं. शेंगदाण्यात तेल आहे पण ते दाबून निघत नाही. त्यासाठी त्याला घाण्यातच घालावं लागतं. त्याप्रमाणंच शरीराचंही आहे. उत्तम आरोग्य हवं असेल तर नियमित व्यायाम आणि आहाराची पथ्यं पाळणं, सर्व प्रकारच्या व्यसनांपासून कोसो मैल दूर राहणं गरजेचं आहे. व्यायाम हा खूप जगण्यासाठी नाही, तर आनंदाने जगण्यासाठी करायचा असतो, असा संदेश ते प्रत्येकाला देतात.

> "मी गव्हाची पोळी बंद केली. माझ्या आवडीचा इंद्रायणी भातही सोडला. रोज उठल्यानंतर सूर्याला अर्घ्य घालून नमस्कार केल्याशिवाय माझ्या दिवसाची सुरूवात होत नाही. जो जगाला प्रकाश देतो त्याला आपण उठल्या उठल्या नमस्कार तरी करायलाच हवा. 'द्राक्षाचा वेल लिंबावरी गेला, कडू का रे झाला? संगतीमुळे!' असे म्हणतात. त्यानुसार चांगली संगत हीही आरोग्यावर, मनावर परिणाम करते. ड्रायफ्रूट, फळे, मध यातून मिळेल तितकीच साखर मी खातो. परमेश्वरानं दिलेलं शरीर सांभाळणं हेच आपलं पहिलं कर्तव्य असायला हवं. आज मला व्यायामाचं व्यसन लागलंय आणि ते कधीच सुटू शकत नाही.
>
> **– संतोष कुंभार**

# पडे झडे माल वाढे



भरत विठ्ठल पाटील
ता. मालेगाव, जि. नाशिक
९६६५९११६५७

**मज आवडते मनापासूनी शाळा**

शाळेत स्वच्छता मोहीम सुरू होती. मुलांच्या हातात झाडू, टोपल्या, गोण्या, डब्बे होते. कोणी वर्गासमोरील परिसर झाडत होते, कोणी कचरा गोळा करून एका ठिकाणी जमा करत होते. त्यांच्या चेहऱ्यावर कामाचा उत्साह होता. शाळा म्हणजे आपलीच जागा, आपलं घर ही भावना त्यांच्या कृतीतून दिसत होती.

मी प्रत्येक गटाजवळ जाऊन सूचना देत होतो. तेवढ्यात माझं लक्ष दोन बहिणींकडे गेलं. दुसरीतली प्रिया आणि पहिलीतली जयश्री. जयश्री थोडी बाजूला उभी होती. तिच्या डोळ्यांत पाणी होतं. पायाला छोटासा दगड लागला होता. किरकोळ खरचटलं होतं; पण तिच्यासाठी ती वेदना मोठी होती. ती हुंदके देत होती. प्रिया तिच्या जवळ बसून तिला समजावत होती. हे लक्षात आलं. जयश्रीचा हुंदका दाटत होता. ती आपल्या अश्रूंना मोकळ्या वाटा करून देत होती. पायाला गोंजारत होती.

''आवं काही नही होस. इतलं तितलं लागी जास. रडो नही आसं,'' प्रिया तिला समजावत होती.

जयश्री रडतच म्हणाली, ''तुले लागाले पाहिजे होतं, मंगन तुले समजतं.''

या वाक्यात निरागस वेदना होती. दुखणं स्वतःला झालं की त्याची जाणीव होते, हे ती सहजपणे सांगत होती. प्रिया थोडी मोठी, थोडी समजूतदार. ती पुन्हा म्हणाली, ''आवं बाई, काम करताना समायीसनच काम करनं पडस. लागनं तं ध्यान नही दे वा. माय सांगस ना आपले. मंगन''

इतक्यात तिचं लक्ष माझ्याकडे गेलं पण ती दचकली नाही. उलट आत्मविश्वासाने म्हणाली, ''हा ना ओ सर, पडी झडी माल वाढे ना..!''

क्षणभर मी थबकलो. सहा-सात वर्षांच्या मुलीच्या तोंडून उमटलेलं हे वाक्य किती गहिरं होतं! 'पडे झडे माल वाढे' म्हणजे पडल्याशिवाय, झडल्याशिवाय वाढ होत नाही. शेतीत पिकं वाऱ्याने झडतात पानं गळतात; पण त्यातूनच नवं पीक उगवतं. तसंच आयुष्यातही जखमा, अपयश, अडचणी या वाढीच्या पायऱ्या असतात. मी तिला होकार दिला होता.

प्रियाने जयश्रीला फक्त शांत केलं नाही; तिने तिला जीवनाचा धडा दिला. छोट्या जखमेवर रडत बसू नये, काम थांबवू नये. ध्येय मोठं असावं. वेदना क्षणभंगुर असतात. तिच्या शब्दांत कणखरपणा नव्हता तर जिद्दीची गोड शिकवण होती. ती आलेली अडचण समजून घेऊन त्यावर उपाय करत होती.

याच प्रसंगातून अनेक जीवनकौशल्येही विकसित होताना दिसतात. सर्वप्रथम संवेदनशीलता आणि सहानुभूती. प्रिया आपल्या लहान बहिणीला धीर देते, तिच्या वेदनेला कमी लेखत नाही; उलट तिला समजावते. दुसरे म्हणजे संवादकौशल्य. दोघींच्या बोलीतील सहज संवादातून विचार मांडण्याची क्षमता, भावना व्यक्त करण्याची ताकद आणि परिस्थिती समजावून सांगण्याची कला विकसित होते.

तिसरे महत्त्वाचे कौशल्य म्हणजे समस्या सोडविण्याची वृत्ती आणि भावनानियंत्रण. छोट्या जखमेवर रडत बसण्याऐवजी काम सुरू ठेवावे, हा दृष्टिकोन मुलांमध्ये जिद्द निर्माण करतो. 'लागलं तरी चालेल; काम थांबवायचं नाही' ही भावना संकटांना सामोरे जाण्याची मानसिक ताकद वाढवते.

स्वच्छता उपक्रमातून जबाबदारीची जाणीव, सहकार्यभाव आणि श्रमाची प्रतिष्ठा या मूल्यांचीही रुजवात होते. शाळेचा परिसर आपलाच आहे, ही भावना सामाजिक बांधिलकी वाढवते. अशा छोट्या अनुभवांतून मुलं फक्त धडा शिकत नाहीत तर आयुष्य जगण्याची तयारी करतात.

त्या दिवशी स्वच्छतेत कचरा कमी झाला असेल; पण माझ्या मनात विचारांची भर पडली. शाळा मला मनापासून आवडते कारण अशा क्षणात शिक्षक म्हणून मीही शिकत असतो. मुलांच्या छोट्या संवादातून जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान उलगडतं. 'पडे झडे माल वाढे' हे वाक्य त्या दिवशी माझ्या मनात कोरलं गेलं.

शाळा केवळ अक्षरओळख करून देत नाही; ती जीवनाची ओळख करून देते. वर्गात शिकवले जाणारे धडे महत्त्वाचेच पण अंगणात, झाडाखाली, उपक्रमांतून आणि मुलांच्या सहज बोलण्यातून जे शिकायला मिळते, ते पुस्तकात सापडत नाही. या अशा साध्या प्रसंगाने मला जीवनाचा मोठा धडा शिकवला. घरातील समजदारीचा हा संवाद शाळेत प्रकटला होता हे विशेष होतं.

त्या छोट्याशा जखमेपेक्षा मोठा होता तो शिकण्याचा क्षण. जयश्रीचे अश्रू थांबले आणि ती पुन्हा कामात सामील झाली तेव्हा मला जाणवलं शाळा मुलांना केवळ उभं राहायला शिकवत नाही; ती पडल्यावर पुन्हा उभं राहण्याची ताकद देते. असे हळवे क्षण आयुष्यात अनेकवेळा येतात. अशा क्षणांतूनच आत्मविश्वासाची छोटी पालवी फुटत असते, हे तितकेच खरे आहे. त्यातूनच मूल आपल्याला शिकवून जात असते. ■■

# खामोशीचा सुवास

## हमने देखी है इन आँखोकी महकती खुशबू



रमा जाधव
कोल्हापूर
८००७९९७२२३

काही गाणी आपल्याला ऐकू येतात आणि काही गाणी आपल्या आत ऐकू येतात. ''हमने देखी है उन आँखों की'' हे तसंच आत ऐकू येणारं गीत आहे. या गीतात प्रेमाचा गजर नाही, जाहीर कबुली नाही; इथे प्रेम म्हणजे नजरेत साठलेली ओल, पापण्यांवर थांबलेला उजेड आणि शब्दांआधी उमलणारी जाणीव. म्हणूनच या गीताचा सूर हलकासा आहे, जणू संध्याकाळच्या वाऱ्याने फुलांच्या कळीला अलगद स्पर्श करावा.

या गीताची पहिलीच प्रतिमा अनोखी आहे. नजरेला सुगंध लाभतो. पाहणं इथे फक्त पाहणं राहत नाही; ते अनुभव बनतं. गुलजारांच्या शब्दांत डोळे फुलांसारखे उमलतात आणि त्या फुलांतून दरवळतो एक न सांगता येणारा सुवास. प्रेमाला हात लावू नका, असं कवी सांगतो कारण काही नाती स्पर्शाने दुखावतात. जपायची असतात ती नात्यांची नाजूकता, जपायचा असतो तो न बोलता उमटणारा अर्थ. प्रेमाला नाव देऊ नका कारण नाव दिलं की त्याची चौकट होते. चौकट आली की आकाश कमी पडतं. या गीतात प्रेमाचा आवाज नाही. तरीही प्रेम सगळीकडे आहे. ही खामोशी रिकामी नाही; ती भरलेली आहे. न थांबणाऱ्या प्रकाशाच्या थेंबासारखी ही भावना काळाच्या प्रवाहातून वाहत राहते. क्षणिक नाही, नाजूक आहे म्हणून टिकाऊ आहे. ओठ काही बोलत नाहीत पण त्यांच्या कडांवर कितीतरी कथा थांबलेल्या असतात. डोळ्यांत कुठेतरी हसू उमललेलं असतं, पापण्यांवर उजेड झुकलेला असतो. हे हसू उघड नाही; ते मनातल्या खोलीत पाझरत राहतं.

लता मंगेशकरांचा स्वर या भावनेला योग्य अशी मृदू किनार देतो. तो नाट्यमय होत नाही, तो कुजबुजतो. हेमंत कुमारांचे संगीतही शब्दांशी स्पर्धा करत नाही; ते शब्दांना श्वास देतं. या तिघांच्या संयोगातून हे गीत एक शांत अनुभव बनतं. ऐकताना असं वाटतं की कुणीतरी शब्दांची कुपी उघडली आहे आणि त्या सुगंधाने आपलं मन भरून गेलं आहे.या गीताचा गाभा म्हणजे प्रेमाची अबोल व्याख्या. प्रेम म्हणजे उच्चारांची गर्दी नव्हे; ते अनुभवाची नीरवता आहे. ते स्पर्शात नाही, तरी स्पर्शाहून जवळ आहे. ते शब्दांत नाही, तरीही शब्दांपेक्षा अधिक सांगून जातं. म्हणूनच हे गीत संपल्यावरही संपत नाही. ते आपल्या मनात थांबतं, नजरेत उतरून राहतं आणि खामोशीला हळूच अर्थ देतं. ■■





## लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा. प्रवास वर्णन, वाचलेल्या आणि भावलेल्या पुस्तकांचे परिचय, आवडलेली व्यक्तिचित्रणे आदींचे स्वागत. सोबत काही पूरक छायाचित्रे, चित्रे असतील तर तीही पाठवा. ती ज्यांच्याकडून घेतली आहेत त्यांची नावेही कळवा. निवडक साहित्यास 'चपराक'मधून प्रसिद्धी दिली जाईल.

आपला मजकूर युनिकोडमध्ये खालील नंबर किंवा ई-मेलवर पाठवा.

**भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०.**

**ई मेल : info@chaprak.com**

# शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त
लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

पावसाळ्याचे दिवस सुरू होऊनही आकाशात ढगांचा मागमूस नव्हता. करपलेल्या शेतात उभा असलेला नामदेव आशेने आकाशाकडे डोळे लावून होता. कोरड्याठाक जमिनीला पडलेल्या भेगा पाहताना त्याला स्वतःच्या आयुष्यालाच तडे गेल्यासारखे वाटत होते. नामदेव हा दोन एकर जमिनीवर आपला उदरनिर्वाह चालवणारा एक साधा शेतकरी. गेल्या काही वर्षांपासून कर्ज एखाद्या सावलीसारखं त्याच्या पाठीशी उभं होतं. खते, बियाणे, कीटकनाशके अशा प्रत्येक गोष्टीसाठी त्याने कर्ज काढले होते पण दुर्दैवाने ना निसर्गाने साथ दिली, ना बाजाराने!

काही महिन्यांपूर्वी गावात नव्या कृषी कायद्यांची जोरदार चर्चा सुरू होती. सुरुवातीला नामदेवलाही वाटले की आता मध्यस्थ कमी होतील आणि आपल्या घामाला चांगला दाम मिळेल! पण हळूहळू वास्तवाची जाणीव होऊ लागली. पूर्वी बाजार समितीत किमान हमीभावाचा थोडा फार आधार तरी होता. आता मात्र व्यापारी थेट बांधावर येऊन खरेदी करू लागले आणि दरही त्यांच्याच मर्जीने ठरू लागले. एकदा नामदेवने वाहतुकीचा खर्च वाचेल या आशेने आपला कांदा थेट एका व्यापाऱ्याला विकायचे ठरवले; पण त्या व्यापाऱ्याने जो दर सांगितला तो हमीभावापेक्षाही खूपच कमी होता. ''नसेल परवडत तर दुसऱ्याला विक,'' असे उर्मटपणे सांगून व्यापारी निघून जाऊ लागला. साठवलेला माल खराब होण्याच्या भीतीने नामदेवला निमूटपणे तोच कवडीमोल दर मान्य करावा लागला.

पूर्वी सहकारी संस्थांकडून मिळणारे थोडे फार संरक्षणही आता जुन्या, कालबाह्य नियमांमुळे कुचकामी ठरत होते. शेतीचे प्रश्न इतके गुंतागुंतीचे झाले होते की शेतीच सोडून द्यावी का? असा हतबल विचार त्याच्या मनात येऊ लागला. नामदेवच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढतच चालला होता. लागवडीचा खर्च दिवसागणिक वाढत होता पण उत्पन्नाची कोणतीही शाश्वती नव्हती. बाजारात दर घसरले तरी नुकसान शेतकऱ्याचे आणि दर वाढले तरी नफा व्यापाऱ्यांच्या खिशात! एका रात्री कंदिलाच्या उजेडात बसून हिशोब करताना नामदेव सुन्न झाला. कर्जाचा आकडा आवाक्याबाहेर गेला होता.

''शेती माझी, जमीन माझी, राबराब राबतोही मीच... मग माझ्या मालाचा दर ठरवणारा तो व्यापारी कोण?'' हा प्रश्न त्याच्या मेंदूला पोखरत होता.'एके दिवशी गावात शेतकऱ्यांची बैठक पार पडली. हक्काच्या हमीभावासाठी आंदोलनात उतरण्याची चर्चा रंगली. नामदेव एका कोपऱ्यात शांतपणे सारे ऐकत होता. व्यवस्थेबद्दल त्याच्या मनात प्रचंड राग खदखदत होता पण परिस्थितीची भीती त्याला मागे खेचत होती. मुलांच्या शाळेची फी, आजारी आईची औषधे आणि सावकाराचा रोजचा तगादा... या चक्रव्यूहात अडकलेला नामदेव उघडपणे बंड करायला धजावत नव्हता. त्याच वेळी मुलाच्या शाळेतून फी भरण्याची नोटीस आली. घरात खायला पुरेसे धान्य नव्हते. अखेर पत्नीने गळ्यातील जुने दागिने गहाण ठेवण्याचा सल्ला दिला. ते ऐकून नामदेवच्या काळजात चर्र झाले. रक्ताचे पाणी करूनही आपण कुटुंबाचे दोन वेळचे पोट भरू शकत नाही, ही जाणीव त्याला आतून खात होती. दुसऱ्या दिवशी सकाळी जड पावलांनी तो पुन्हा शेतात पोहोचला. कोरड्या मातीवर हात ठेवत तो स्वतःशीच पुटपुटला, ''मी हार मानणार नाही.'' पण त्याच्या आवाजात एक खोल थकवा होता. निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करणे एकवेळ सोपे पण बाजारातील अन्यायकारक व्यवस्थेशी लढणे महाकठीण आहे, हे त्याला कळून चुकले होते. या विषम लढाईत शेतकरी केवळ कर्जबाजारी होत होता. तरीही, कधीतरी न्याय उगवेल या भाबड्या आशेवर तो दरवर्षी मातीत बी पेरत होता. पण आता हळूहळू बदल दिसू लागला होता. शेतकऱ्याचा प्रश्न हा केवळ त्याचा एकट्याचा नसून तो संपूर्ण समाजाचा प्रश्न आहे, ही जाणीव आता लोकांमध्ये रुजू लागली होती. शेतकऱ्याला योग्य दर मिळावा, शोषक अटी नष्ट व्हाव्यात आणि स्थानिक पातळीवर एक मजबूत, शेतकरीधार्जिणी व्यवस्था उभी राहावी, यासाठी सर्वांनी संघटित होण्याची गरज निर्माण झाली होती. त्या दिवशी नामदेव पुन्हा एकदा शेतात उभा राहून आकाशाकडे पाहत होता. आकाशात ढग अजूनही नव्हते पण त्याच्या मनात मात्र आशेचे एक नवे आभाळ दाटून आले होते कारण त्याला उमगले होते की, शेतकऱ्याचे भविष्य केवळ पावसाच्या लहरीवर नाही तर आता समाजाच्या खंबीर साथीवरही अवलंबून आहे. ■■

# वाचनीय, ज्ञानवर्धक आनंदझरा




नागेश शेवाळकर
९४२३१३९०७१

**सुखाचा सदरा, आनंदाचे झाड या कविकल्पना नाहीत तर प्रयत्नाने प्रत्यक्षात उतरणारे ते स्वप्न आहे! शिरीष चिटणीस हे नावाजलेले, वैविध्यपूर्ण लेखन करणारे लेखक म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांना लेखनात, वाचनात खूप आनंद मिळतो. मिळालेला आनंद स्वत:पुरता मर्यादित न ठेवता 'आनंदझरा' हा अक्षररुपी ठेवा 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून पुस्तकरुपाने आणला आहे.**

डॉ. श्रीपाल सबनीस हे प्रस्तावनेत म्हणतात, ''आनंदझरा हे अर्थपूर्ण शीर्षक मनाची व आत्म्याची तहान भागवणारे आहे. एक दुर्मीळ दिलासा या शब्दांत दिसून येतो. वाचकांच्या अस्वस्थ मनाला शांत करतो; आश्वासक दिलासा देणारे हे लेखन आनंदाचा पान्हा पाझरत ठेवते...''

प्रकाशक घनश्याम पाटील यांची पाठराखण लेखक चिटणीस यांची मनोवृत्ती प्रकट करते. पाटील खूप आत्मियतेने लिहितात, ''अनुभवलेल्या माणसांतील चांगले गुण हेरणे, त्यांना प्रोत्साहन देणे, प्रसंगी आवश्यक त्या सहकार्याचा हात देणे ही शिरीष चिटणीस यांची सहजवृत्ती आहे. या पुस्तकातील पानापानातून ती दृश्य स्वरुपात वाचकांसमोर येते.''




या पुस्तकातून जाणवते ते म्हणजे चिटणीस यांचे अफाट वाचन! केवळ भरपूर वाचन आहे असे नव्हे तर त्यावर चिंतन व मनन करून ते स्वत:ची अनुभूती शब्दांत मांडतात. त्यांच्या लेखनात नेहरू येतात, देशबंधू दास आणि महात्मा गांधी सहजपणे डोकावतात. लेखकाच्या लेखणीला सशस्त्र स्वातंत्र्यलढ्याची धार आहे. चाफेकर बंधू, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या कार्याचा अभिमान आहे. तद्वत पुरुषार्थ गाजविणाऱ्यांचा इतिहास याबद्दल ममत्व आहे.

नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. त्या आनंदाने चिंब झालेले चिटणीस भाषा जपूया, वृद्धिंगत करूया! या लेखात भाषेचा लेखाजोखा मांडताना कोकणी भाषेचे पहिले ज्ञानपीठ मिळविणारे रवींद्र केळेकर यांचे 'रायटर हा प्रथम फायटर असला पाहिजे', हे वाक्य सहजपणे पेरताना आजही या वृत्तीची नितांत गरज आहे हे नकळत सांगून जातात. लेखक इथेच थांबत नाहीत तर कवी शंकर भांडारी यांनी दामोदर मावजो यांना भाषेचे महत्त्व पटवून देताना उच्चारलेले वाक्यही लिहितात, 'कोकणी भाषा जिवंत उरली तरच तुम्ही लिहिणार आणि लोक तुम्ही लिहिलेले वाचणार!' कोणतीही भाषा जिवंत ठेवण्यासाठी साहित्यिकांनीच पुढाकार घ्यायला हवा हेच लेखक इथे आग्रहाने सांगतात. ऊर्जादायी आणि प्रेरक शमीमा या गायिकेने मसापच्या मंचावर येऊन पती मझहर सिद्दीकी आणि संच यांच्यासह माझे माहेर पंढरी, बोलावा विठ्ठल या धार्मिक रचनांसह खुसरो बाजी प्रेम की... हे काश्मीरी गीत, तसेच रेशमाच्या रेघांनी... ही लावणी गाऊन धम्माल उडवून दिली. शमीमा अख्तर या गायिकेचा मनस्पर्शी प्रवास चिटणीस यांनी अत्यंत तळमळीने मांडला आहे. अण्णा भाऊ साठे यांच्याविषयी कृतज्ञतापूर्वक लिहिलेल्या 'सिद्धहस्त अण्णा भाऊ' या लेखात अण्णांच्या एकूण साहित्याचा खूप छान आढावा लेखकाने घेतला आहे. याच लेखात लेखक साहित्य क्षेत्रात असलेल्या उच्चनीचतेबद्दल परखडपणे व्यक्त होतात. यावरून त्यांचे समतादायी विचार स्पष्टपणे जाणवतात. सध्या सामाजिक माध्यमांवर असे खूप छान व्हाट्सअप समूह आहेत की, जे नवनवीन चांगले प्रयोग करीत असतात. असाच एक अत्यंत चांगला नि केवळ वाचन-लेखनाची सातत्याने जोपासना करणारा समूह म्हणजे 'आम्ही पुस्तकप्रेमी!' पुस्तकांवर अर्थात वाचन-लेखनावर प्रेम करणाऱ्यांचा हा समूह आहे. लेखक चिटणीस यांनी बौद्धिक वारसांचे काय? या लेखात पुस्तकप्रेमी समूहाच्या संमेलनाचा उल्लेख करताना उद्घाटक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या भाषणातील एक वाक्य अधोरेखित केले आहे, 'नवश्रीमंत, शिक्षित वर्गाची शोकांतिका ही आहे की त्यांच्या किंमती स्थावर- जंगमास वारस आहे पण बौद्धिक संपदा नि समाजबांधिल वृत्ती पोरकी झाली झाली आहे.' इथे जो स्थावर-जंगम मालमत्तेचा उल्लेख आला आहे त्याला अनुसरून चिटणीस यांनी लेखात महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. लेख वाचताना प्रश्नांची एक शृंखला वाचकांसमोर उभी राहते. गीते प्रेरणादायी, स्फूर्तिदायक, चैतन्यमयी, देशप्रेमी, भक्तिमय, क्रांतिकारी इत्यादी अनेक प्रकारची असतात. शिरीष चिटणीस यांनी देशविदेशातील गीतांचा उहापोह 'हुकूमशाहीला वेसण घालणारी गीते' या लेखात केला आहे. कवयित्री शांता शेळके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांनी 'सत्याला सामोरे जाण्याचे बळ' या लेखात त्यांच्या एकूण लेखनाचा आस्वादात्मक परिचय करून दिला आहे. लोकमंगल ग्रुप सातारा येथील संस्था राबवित असलेले अनेकानेक उपक्रम, साहित्यविषयक कार्यक्रम यांची माहिती लेखकाने प्रसंगानुरूप त्या-त्या लेखाच्या अनुषंगाने लिहिली आहे. आपण माणसं आरंभशूर असतो. एखादा प्रण, संकल्प मोठ्या उत्साहात करतो परंतु तो पूर्णत्वास जात नाही. लेखकाने धैर्या विनोद कुलकर्णी या बारा वर्षाच्या मुलीने केलेला एक धाडसी पण तितकाच अवघड संकल्प कसा पूर्ण केला याचे रोमहर्षक वर्णन धाडसी धैर्या या लेखात केले आहे तसेच प्रदीप देवरे या तरुणाच्या जिद्दीची, चिकाटीची कथा वर्णन केली आहे. शिरीष चिटणीस यांच्या 'आनंदझरा' यात जो वाचक विहार करील तो नक्कीच आनंदी होईल हे निश्चित. पुस्तक वाचनीय, ज्ञानवर्धक आहे. ■■

| | |
|---|---|
| **आनंदझरा** | : स्तंभलेखन |
| **लेखक** | : शिरीष चिटणीस |
| **प्रकाशक** | : चपराक प्रकाशन |
| **पाने** | : १५० |
| **मूल्य** | : ३००/- |

'चपराक'ची ग्रंथसूची

# पर्यावरण रक्षण की जागेसाठी धडपड?

सचिन माथेफोड

**लोणी काळभोर :** एका नदीकाठी वसलेला मोठा शैक्षणिक कॅम्पस. विस्तीर्ण परिसर, शांत वातावरण आणि शिक्षणासाठी अनुकूल अशी जागा, अशी या ठिकाणाची ओळख निर्माण झाली. वर्षानुवर्षे आसपासच्या गावातील लोक या नदीकाठावर कचरा टाकत होते. हळूहळू त्या ठिकाणी कचऱ्याचा मोठा डेपो तयार झाला. दुर्गंधी, अस्वच्छता आणि पर्यावरणावर होणारा परिणाम या सगळ्या गोष्टी स्थानिकांना परिचित झाल्या होत्या.

मात्र काही काळापासून या परिस्थितीत अचानक बदल दिसू लागला. या परिसरात असलेल्या मोठ्या शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनाने कचरा डेपो हटवण्याची जोरदार मोहीम सुरू केली.आंदोलन, निवेदने, जनजागृती आणि विविध मार्गांनी या डेपोविरोधात आवाज उठू लागला. वरकरणी पाहता हा लढा स्वच्छतेसाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी असल्याचे चित्र दिसते.

पण या प्रश्नाची दुसरी बाजूही चर्चेत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांत या शैक्षणिक संस्थेने हळूहळू गावकऱ्यांचा विश्वास जिंकत परिसरातील काही मोक्याच्या जागांवर प्रभाव निर्माण केला आहे. त्यामुळे कचरा डेपो हटवण्याच्या आंदोलनामागे केवळ पर्यावरणाची चिंता आहे की त्या जागेभोवती भविष्यातील काही वेगळे नियोजन आहे, असा प्रश्न काही ग्रामस्थ उपस्थित करतात.

वास्तव असे आहे की नदीकाठावरील ती जागा भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. कचरा डेपो असल्यामुळे त्या भागाकडे फारसे लक्ष जात नव्हते पण जर हा डेपो हटवला गेला तर त्या परिसराचे स्वरूप पूर्णपणे बदलू शकते. त्यामुळे काही जणांच्या मते स्वच्छतेच्या आंदोलनामागे भविष्यातील जमीनविषयक समीकरणांचा विचारही दडलेला असू शकतो.

दुसरीकडे स्थानिक नागरिकांचा मुद्दाही तितकाच गुंतागुंतीचा आहे. अनेक गावातील कचरा वर्षानुवर्षे



याच ठिकाणी टाकला जात असल्याने ती जागा एकप्रकारे सर्व गावांची 'सवयीची सोय' बनली आहे. अचानक डेपो हटवण्याची मागणी झाल्यास कचरा टाकायचा कुठे? हा प्रश्न उभा राहतो. भविष्यात या ठिकाणी कचरा प्रकल्प तयार करण्याचा विचार आहे. त्यामुळे काही ग्रामस्थ या आंदोलनाबाबत साशंक आहेत.

याशिवाय या संपूर्ण प्रकरणात आणखी एक चर्चेचा मुद्दा समोर येतो. काहींच्या मते, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे परिसरात कोणी सहज फिरकत नाही. अशा जागांवर काही अनधिकृत हालचाली किंवा धंदे सुरू ठेवणे सोपे असते. मग हे अनधिकृत धंदे कोण करत आहे व कोणाच्या पाठिंब्यावर सुरू आहेत, असा आरोपही वेळोवेळी केला जातो. त्यामुळे डेपो कायम राहावा असे काहींना वाटत असण्याची शक्यता स्थानिक पातळीवर बोलली जाते.

या सगळ्या परिस्थितीत खरे प्रश्न अनेक आहेत आणि उत्तरे मात्र अस्पष्ट आहेत. शैक्षणिक संस्थेचे म्हणणे असे आहे की, नदीकाठी कचरा साठणे हे पर्यावरणासाठी धोकादायक आहे व विद्यालयाच्या कॅम्पसमधून कचऱ्याच्या गाड्या जात असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे डेपो हटवण्याची मागणी तसेच या रस्त्याने गाड्या आणू नये, ही मागणी ते करत आहेत. तर दुसरीकडे काही ग्रामस्थ विचारतात, जर ही जागा इतकी वर्षे कचरा डेपो म्हणून वापरली जात होती तर अचानक आता एवढा तीव्र विरोध का? तसेच ओढ्याचा रस्ता कुठे गेला? नदीच्या दिशेने जाणारा रस्ता कुठे गेला? डेपो हटवल्यानंतर त्या जागेचे पुढे काय होणार, हे प्रश्नही ते उपस्थित करतात. ग्रामस्थांमुळे जर शालेय प्रशासनाला, विद्यार्थ्यांना त्रास होत असेल तर शालेय प्रशासन व विद्यार्थ्यांमुळे ग्रामस्थांना जो त्रास होतो त्याचे काय? याच विद्यालयातील अनेक विद्यार्थी या गावामध्ये हॉस्टेलमध्ये किंवा कुठे फ्लॅट घेऊन राहत आहेत. त्याचा देखील कचरा यामध्ये आहे. मग त्यांनी कुठे जायचे? खरं तर या प्रश्नात कुणी पूर्णपणे बरोबर किंवा चूक आहे असे सरळपणे म्हणणे अवघड आहे. एका बाजूला स्वच्छतेचा आणि पर्यावरणाचा मुद्दा आहे; तर दुसऱ्या बाजूला जमिनीचे भविष्यातील उपयोग, स्थानिक राजकारण आणि विविध हितसंबंधांची शक्यता आहे. म्हणूनच या संपूर्ण प्रकरणात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पारदर्शकता आणि स्पष्टता असणे गरजेचे आहे.

जर कचरा डेपो हटवायचा असेल तर पुढे कचरा व्यवस्थापनाची पर्यायी व्यवस्था काय असेल? त्या जागेचा भविष्यात नेमका वापर कसा होणार? आणि या निर्णयात स्थानिक गावकऱ्यांची भूमिका काय असेल? हे प्रश्न स्पष्टपणे समोर आले तर अनेक गैरसमज आपोआप दूर होऊ शकतात.

नदीकाठ स्वच्छ राहणे हे निश्चितच आवश्यक आहे पण त्याच वेळी स्वच्छतेच्या नावाखाली किंवा कचऱ्याच्या आड कोणतेही अदृश्य हितसंबंध लपलेले नाहीत ना? हा प्रश्न विचारणेही समाजासाठी तितकेच आवश्यक आहे. कधी कधी कचऱ्याचा ढीग दिसतो तो फक्त वरवरचा असतो; खरे प्रश्न मात्र त्याच्या आड दडलेले असतात!

---

# पंढरपूर तालुक्याच्या विकासासाठी निधीचा वर्षाव

## रिंग रोड, नवीन पूल आणि रस्त्यांच्या कामांना भरघोस निधी : प्रशांत परिचारक

### राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये कोट्यवधींच्या कामांना मंजुरी

**पंढरपूर, (प्रतिनिधी) :** राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प पंढरपूर तालुक्यासाठी विकासाची गंगा घेऊन आला आहे. यामध्ये विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. पंढरपूर शहर आणि ग्रामीण भागाला जोडणाऱ्या रस्ते व पुलांच्या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता, अशी माहिती माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये रिंग रोड आणि उड्डाणपूलांसाठी मोठा निधी जाहीर करण्यात आला आहे. प्रशांत परिचारक हे मागील अनेक वर्षापासून रिंग रोड व उड्डाणपुलासाठी फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करीत होते. या मागणीची दखल घेत वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या वाखरी-टाकळी-अनवली-मुंढेवडी-अजनसोंड-देगांव या रिंग रोडसाठी तब्बल २७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

**भीमा नदीवर होणार दोन नवीन पूल**

तालुक्यातील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी भीमा नदीवर दोन महत्त्वाचे पूल उभारले जाणार आहेत. यात मुंढेवाडी-अजनसोंड रस्त्यावर भीमा नदीवर नवीन पुलासाठी ३२ कोटी ५० लाख आणि शहरातील जुन्या दगडी पुलाशेजारी दुसरा समांतर पूल उभारण्यासाठी ४५ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यामुळे वारी कालावधीत आणि दैनंदिन कामकाजात होणारी गर्दी कमी होण्यास मोठी मदत होईल.

यामुळे शहराबाहेरून अवजड वाहतूक जाण्यास मदत होऊन भाविकांची आणि स्थानिकांची सोय होणार आहे. याशिवाय वाहतूक सुरळीत करण्यासाठी ठाकरे चौक पंढरपूर ते टाकळी रोड रूंदीकरणासह उड्डाणपुलासाठी ५० कोटी १६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**ग्रामीण रस्त्यांच्या कामांना गती**

शहर तसेच ग्रामीण भागासाठी मिळालेला निधी: १) गुंजेगाव-तनाळी-कासेगाव ते पंढरपूर प्रजिमा १६८ मध्ये सुधारणा करणे. **३१ कोटी ५० लाख रुपये.** २) गोपाळपूर-रांझणी-ओझेवाडी रा.मा. ३९२ मध्ये सुधारणा करणे. **३८ कोटी.** ३) बोहाळी ते खर्डी रा.मा. ३९१ मध्ये सुधारणा करणे **१ कोटी ५० लाख.** ४) खर्डी ते तपकिरी शेटफळ प्रजिता १११ मध्ये सुधारणा करणे. **१ कोटी ५० लाख.** ५) उंबरगाव ते सोनके रस्ता प्रजिमा ८५ मध्ये सुधारणा करणे **२ कोटी.** ६) रांझणी ते सरकोली रस्ता सुधारण करणे **६ कोटी.** ७) पंढरपूर ठाकरे चौक ते टाकळी रोड रूंदीकरणास उड्डाणपुलासाठी **५० कोटी १६ लाख.** ८) भटुंबरे-पखालपूर ते मेंढापूर ओ.डी.आर १०० मध्ये रूंदीकरणासाठी २० **कोटी ५० पन्नास लाख.** ९) श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्ग पिराचीकुरोली प्रजिमा ८१ मध्ये सुधारणा करणे **२५ कोटी.**

पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून वाखरी ते पंढरपूर या अंदाजे ८ कि.मी. रस्ता चौपदरीकरण व रेल्वे ओव्हर ब्रिजच्या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाने खास बाब म्हणून १२० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. या कामामुळे पंढरपूर शहरात प्रवेश करताना होणारी वाहतूक कोंडी कायमची दूर होणार आहे. या कामांमुळे तालुक्याच्या दळणवळण व्यवस्थेला नवी दिशा मिळेल. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले व पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांचे आम्ही ऋणी आहोत.

**– प्रशांत परिचारक**